## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष
## जिल्हा परिषद यवतमाळ
## दुरध्वनी ०७२३२-२५६७६७
## ई निवीदा सूचना क्रं०१/२०२१-२०२२

राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दिनांक ४/९/२०२० शासन निर्णयान्वे राज्यात जल जीवन मिशन कार्यक्रमाची अंमलबंजावणी करण्यात येत आहे जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचनानुसार आवश्यक मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यास प्रतीबंध करण्यात आला असुन सदर मनुष्यबळ हे केवळ बाहययंत्रनेव्दारे (Outsourcing ) घेण्याची तरतुद आहे सदर जल जीवन मिशन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बाहययंत्रनेव्दारे कनिष्ठ अभीयंता व पदे हे मनुष्यबळ जिल्हयासाठी उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे. यासाठी पाणी व स्वच्छता क्षेत्रात पुरेसा अनुभव असलेल्या मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहय यंत्रणाकडुन ई निविदा प्रणालीव्दारे, एकलिफाफा ,जल जिवन मिशन अंतर्गत पदे भरण्यासाठी पाणी व स्वच्छता विभागाच्या पॅनेलवर घेण्यासाठी बाहय यंत्रणेकडुन ई निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१ ई निविदा फि रुपये **५००/-** इसारा रक्कम रुपये **२५०००/-** ऑनलाईन पध्दतीने स्टेट बॅक ऑफ इंडीया च्या नेट बॅकींग किंवा एन.ई.एफ.टी व्दारे भरणा करावा.सदर बाबी मध्ये सुट असल्यास सक्षम प्राधीकरणाचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे ,इतर प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

२.अनामत रक्क्म निविदाकाराने निविदा रक्कमेच्या १% रक्कम Demand Draft/FDR व्दारे राष्ट्रीयकत बॅकेतीचे कराराच्या वैध कालावधीकरीता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांचे नावाने निविदा स्वीकृत झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत भरणा करावा लागेल.

३.निविदा स्विकृतीचा कालावधी दिनांक 28.7.2021 रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन ते दिनांक 3.8.21 सायकाळी ५.०० वाजेपर्यत असुन निविदा दिनांक 4.8.21 रोजी सकाळी ११.००वाजता जिल्हा प्रकल्प संचालक पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जि.प.यवतमाळ यांचे समक्ष उघडण्यात येईल.

४.सदर ई निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**ई निविदा अंतर्गत खालील कागदपत्राच्या सांक्षाकिंत प्रती अपलोड करणे अनिवार्य आहे सर्व बाबीची पुर्तता करणारे निविदाधारकाच पात्र राहील.**

१.पॅन कार्ड

२.टॅन कार्ड

३.वस्तु व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र (GSTIN) ,कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संगठन कार्यालय यांचे नोंदणी प्रमाणपत्र.मागील सहा महीन्याचे EPF Challan ECR Statement सोबत जोडणे आवश्यक.

४.राज्य कर्मचारी विमा कार्यालय यांचे नोंदणी प्रमाणपत्र

५.कामगार उपायुक्त कार्यालय यांचेकडील लेबर लाईसेंस

६.व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र

७.आर्थिक वर्ष २०१८-२०१९, २०१९-२० ,२०-२१ चे टर्नओव्हर सर्टीफीकेट.

८.शासकीय/निमशासकीय कार्यालयात तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा केल्याचे आदेश व काम समाधानकारक असल्याचे अनुभव प्रमाणपत्र.

९. शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये काळया यादीत नाव समाविष्ठ नसलेबाबतचे स्वंयघोषणापत्र लेटर पॅडवर देणे आवश्यक राहील.

१०.Shop Act Registration नोंदणी प्रमाणपत्र.

५.ज्या बाहय संस्थेला काम मंजुर करण्यात आलेले आहे त्यांनी आदेश देण्यापुर्वी त्यांचेकडुन ५०० रुपये रक्कमेच्या बॉन्ड पेपरवर मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ तथा जिल्हा प्रकल्प संचालक पाणी व स्वच्छता मिशन जि.प.यवताळ यांनी निश्चीत केलेल्या अटी व शर्तीसह करारनामा करुन दयावा लागेल.

६.करारनामा कालावधी एक वर्षापर्यत राहील करारनाम्याचा कालावधी कमी करणे किंवा जास्त करणे मुदतवाढ देणे या बाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ जि.प.यवताळ यांना राहील.

**संस्थेची निवड करण्यासाठी जिल्हास्तरावर समितीची स्थापना करण्यात आलेली असुन ती खालील प्रमाणे असेल.**

| अ.क्र | सदस्याची नावे | पद |
|---|---|---|
| १ | मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ | पद अध्यक्ष |
| २ | कार्यकारी अभिंयता ग्रा.पा.पु जि. प. यवतमाळ | सदस्य |
| ३ | लेखाधिकारी जल जिवन मिशन | सदस्य |
| ४ | मा.प्रकल्प संचालक जि.पा.स्व.मि.जि.प.यवतमाळ | सदस्य सचिव |

**मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहय यंत्रणेची निवड**

मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेस कंपनी/संस्था यांना शासकीय कार्यालयास किमान २ वर्षाचा तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा करण्याचा अनुभव असला पाहीजे ज्यामध्ये कनिष्ठ अभियता या पदास तांत्रिक मनुष्यबळ समजण्यात येईल .

**सस्था निवडीचे तांत्रिक निकष-**

| **अ.क्र** | **निकष** |
|---|---|
| १ | तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा करणेची क्षमता असावी |
| २ | मागील तीन वर्षाचे लेखा परिक्षण ताळेबंद |
| ३ | बाहय यत्रणेची वित्तीय क्षमता २५लक्ष वार्षिक पेक्षा कमी नसावी |
| ४ | बाहय यत्रणेची मुळ नोदणी निविदा बोलाविलेल्या जिल्हयात किंवा विभागात असावी. |
| ५ | बाहय यंत्रणेत शासकीय कामाचा अनुभव असावा. |

**कनिष्ठ अभियंता मनुष्यबळाची पात्रता**

| **अ.क्र** | **पदाचे नाव स्तर मानधन** | **शैक्षणिक अर्हेता** |
|---|---|---|
| १ | जिल्हा स्तर- कनिष्ठ.अभियंता २ पदे एकत्रित मानधन- ३५०००/- | स्थापत्य अभियांत्रिकी/पर्यावरण अभियांत्रिकी पदवी असणे आवश्यक ,पर्यावरण अभियांत्रिकी पदवीस प्राधान्य. |
| २. | तालुकास्तर- कनिष्ठ अभियंता १६पदे एकत्रित मानधन- २५०००/- | स्थापत्य अभियांत्रिकी पदविधारक असणा-यास प्राधान्य. |
| | कनिष्ठ अभियंता | पदविका धारक असल्यास मानधन २२०००/- राहील. |

**भविष्यात गरजेनुसार मागविण्यात येवु शकतील अशी पदे**

महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा विभागाचे शासन निर्णय दिनांक ४/९/२०२० अन्वये जलजिवन मिशन अंतर्गत जिल्हयातील कामाची व्याप्ती विचारात घेवुन खालीप्रमाणे मनुष्यबळनिर्माण करण्यात आले आहे

१.प्रकल्प संचालक तात्रिक
२.प्रकल्प संचालक आर्थिक.
३.प्रकल्प संचालक नियंत्रण.
४.समन्वयक माहीती शिक्षण संवाद तज्ञ
५.समन्वयक मनुष्यबळ विकास बळकटीकरण व प्रशिक्षण
६.समन्वयक अंमलबजावणी सहाय संस्था
७.समन्वयक एकात्मिक माहीती विकास प्रणाली
८.समन्वयक पाणी गुणवत्ता.

भविष्यात सदर मनुष्यबळ जिल्हा स्तरावरुन घेण्याचे निर्देश प्राप्त झाल्यास सदर मनुष्यबळ घेण्याचे प्रस्तावित आहे

सदर पदाची शैक्षणिक अर्हता व मानधन बाबत शासनाचे प्राप्त होणा-या मार्गदर्शनानुसार कळविण्यात येईल.

**देय मानधन-**

कनिष्ठ अभियंता तालुकास्तर १६ यांचे मानधनावरील खर्च कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि प यवतमाळ यांच्या चार टक्के सादील निधीतुन करण्यात येईल , जिल्हास्तरावर ०२ यांच्या मानधनाचा खर्च स्वच्छ भारत मिशन अंतर्गत माहीती व शिक्षण संवाद अंतर्गत करता येईल असे एकुण १८ अभियंत्याचे मानधन टप्पानिहाय सस्थेला देण्यात येईल.

संस्थेने असे मनुष्यबळ पुरविल्याबदल १० टक्के सर्विस चार्ज १८ टक्के वस्तु व सेवा याबाबत कार्यवाही करुन संस्थेस मानधन अदा करण्यात येईल. तथापी ई निविदा व्दारे प्राप्त होणा-या एल-१ संस्थेस आदेश देण्यात येईल.

**संस्थेचा कालावधी**

संस्थेची निवड ही करार केल्यापासुन एक वर्षापर्यत राहील, संस्थेचे काम समाधानकारक नसल्यास त्यांचे काम संपुष्ट्रात आणण्याचे अधिकार मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांच्याकडे राखीव ठेवण्यात येत आहे. सदर करारनामा/आदेश२०२१ किंवा कार्यालयाच्या निर्देशानुसार यापैकी जे अगोदर घडेल तेव्हा आपोआप संपुष्ट्रात आणण्यात येईल

बाहय यंत्रणेस पुरवठा/ सेवा संपुष्टात आणावयाची असल्यास किमान एक महीना अगोदर मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांना लेखी स्वरुपात कळविण्यात यावे अशावेळी गुणानुक्रमे पुढील क्रंमाने पात्र संस्थेची निवड करण्यात येईल पुन्हा निविदा मागविण्याची आवश्यकता राहणार नाही.जल जिवन मिशन कार्यक्रमातील कनिष्ठ अभियंता यांना यवतमाळ जिल्हयातील तालुकास्तरावर कामे करावे लागेल ,गटविकास अधिकारी व उपअभियंता पापु यांच्या सनियत्रणा खाली कामे करावे लागेल तालुक्याला कोणतेही दौ-याचे अतिरीक्त मानधन अदा केले जाणार नाही.

जल जिवन मिशन कार्यक्रमातील बाहयसंस्थेकडुन घेण्यात आलेल्या मनुष्यबळास मानधन अथवा कोणताही निधी थेट दिला जाणार नाही कोणत्याही स्वरुपाचा पत्रव्यवहार हा थेट संस्थेशी करण्यात येईल संस्थेचे दरमहा देयकाची मागणी सबधीत जिल्हा प्रकल्प संचालक पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जि.प.यवतमाळ यांच्याकडे करावी.

कोणत्याही प्रकारच्या विवादास्पद बाबीसाठी मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांच्याकडे दाद मागता येईल ,मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांच्या निर्णय अंतिम राहील.

**अर्टी व शर्ती**

१.जल जिवन मिशन कार्यक्रमाकरीता कनिष्ठ अभियंता यांच्या शैक्षणिक पातळी बाबतची खात्री पटविण्यासाठी त्यांच्या अभियांत्रिकी पदवी/ पदविका प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करावी लागेल.

२. जल जिवन मिशन कार्यक्रमाकरीता कनिष्ठ अभियंता हे पाणी व स्वच्छता क्षेत्रातील कामाचा अनुभव असणारे शैक्षणिक पात्रताधारक उमेदवार आवश्यक असुन ,असे उमदेवार उपलब्ध नसल्यास इतर पात्र कनिष्ठ अभियंते उपलब्ध करुन देणेची जबाबदारी पुरवठादार संस्थेची राहील.

३.कनिष्ठ अभियंता ,यांचे संपुर्ण नाव, भ्रमनध्वनी क्रमाक ,पत्ता, याप्रमाणे माहीती व मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावे लागेल.

४.सदरील मनुष्यबळाने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन चे डीपीआर, इस्टीमेट ई,तयार करणे तसेच जल जिवन मिशनच्या योजनेत खात्यांचे उपअभियंता शाखा अभियंता यांना मदत करणे आवश्यक आहे.

५.जल जिवन मिशन कार्यक्रमातील कनिष्ठ अभियंता बाबत तक्रांर किंवा कामातील अनियमितता आढळल्यास अभियंत्यांची सेवा त्वरीत संपुष्टात आणुन पर्यायी मनुष्यबळ १५ दिवसाच्या आत देणे बंधनकारक राहील ,मनुष्यबळाने स्वतःहुन राजीनामा देणे किंवा कामावर येण्यास नकार देणे ,अशा परिस्थितीत संस्थेने आठवडयाच्या आत पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

९.बाहय संस्थेने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मनुष्यबळाचे देय मानधन संस्थेमार्फत नियुक्त मनुष्यबळास अदा केले जाईल. याबाबत नियुक्त कर्मचा-या कडुन मानधनाबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रांरीस हे कार्यालय जबाबदार नसेल.

१०.बाहय संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळास तालुक्याअंतर्गत दौरे प्रवास यासाठी वेगळयाने भत्ता प्रवास दिला जाणार नाही ,तालुकास्तरावर प्रवास हा त्यांच्या कार्याचा भाग समजण्यात येईल.

११.बाहय संस्थेने परिपुर्ण देयक सादर केल्यांनतर देयकाची अदाईगी संस्थेस करण्यात येईल.

१२.कोणत्याही प्रकारचा विवाद उद्रभवल्यास मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांच्याकडे दाद मागता येईल. मा.मुकाअ यांचा निर्णय अंतिम राहील.

१३.कोणत्याही निविदा स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे किंवा सर्व निविदा नाकारण्याचे हक्क नियम स्वाक्षरीदाराने राखुन ठेवलेले आहे.

(मनोज कुमार चौधर)
निमा प्रकल्प संचालक
जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष
जि.प.यवतमाळ

(डॉ. श्रीकृष्ण पांचाळ)भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी
जि.प.यवतमाळ